Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Volume-2, Issue-5, Nov-2012 Available online at www.aygrt.isrj.net

खाली जमीन वर आकाशमधील वंचित विश्वाचे स्वरुप

पारसे बिरा दशरथ

सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी
ता. बार्शी जि. सोलापूर

सारांश :- प्रत्येक माणूस जन्माला येतो तो एक जमीन घेवून आणि ही जमीनच त्याच्या जीवनाचा आधार असते. अशा प्रकारचा आधार घेवून जन्माला आलेल्या माणसाला वरचे आकाश हेच त्याचे छत्र असते. तेच सत्यही असते. कारण त्या माणसाला गाव, नाव, आई–वडिल, नातेवाईक अथवा जात, धर्म, कुल, गोत्र अशासारख्या कोणत्याच अस्तित्त्वाच्या खुणा नसतात. तेव्हा हा माणूस आपल्या अस्तित्त्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळेला त्याचा हा शोध आत्मसन्मानाच्या जाणिवेतून सुरु होतो. आणि तोच त्याचा आत्मशोध असतो. तो आत्मभानातून जन्माला आलेला असतो. त्याने एका विशिष्ट परिस्थितीमध्ये जन्मलेल्या जीवनाचा किंवा त्या जीवाने अनुभवलेल्या अनुभूतीचा तो शोध असतो. त्याच्या या स्वत्त्व शोधामुळे त्याला आत्मबळ प्राप्त झालेले असते. तो स्वत्त्वशोधामध्ये स्वतःच्या आयडेंटिटीचा व आत्मशोधामध्ये स्वतःला सर्वांगांनी जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. स्वत्वशोधातून स्वतःचा प्रतिभाधर्म, स्वधर्म प्रतित होतो, आणि आत्मशोधातून एकूणच मानवी मनाशी भिडता येते.

प्रस्तावना-

जो स्वत्त्व शोध टाळतो त्याला कसलाच शोध घेता येता येत नाही. एवढेच नव्हेतर स्वत्त्वविहीन व्यक्ती कोणत्याच समाजाची निर्मिती करु शकत नाही. कारण लेखक कलावंत हाही माणूस असतो त्याला त्याच्या जगण्याची सार्थकता अनेक संबंधामध्ये जगताना अनुभवास आलेली असते. त्याचे जगणे म्हणजे एक एक संबंध अर्थपूर्ण करणे असते. याचाच अर्थ असा की, माणूस एक संबंधाचा गुंता असतो, मात्र असला गुंतागुंतीचा कोणताच संदर्भ न घेता लहानाचा मोठा झालेला माणूस त्या माणसाचे नांव आहे. डॉ.सुनिलकुमार लवटे हे होय.

'खाली जमीन वर आकाश' हे आत्मकथन नुकतेच मेहता पब्लिशिंगहाऊस या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केले आहे. या निमित्ताने डॉ.सुनिलकुमार लवटे यांनी आपला जीवनपट, कर्मकहाणी एकूण ४८ भागामध्ये सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रत्येक माणसाला कोणीतरी आई–बाप, भाऊ–बहिण, कुटुंब असते घरदार असते, गणगोत असते, असे गणगोत जोडून तो जगत असतो. एकूणच त्याला घरचा आणि कुटुंबाचा फार मोठा आधार वाटत असतो. केवळ या सर्व मायेमुळेच त्याला आपण एकाकी, पोरके, निराधार आहोत असे वाटत नाही. मात्र अशा कोणत्याच प्रकारचा आधार नसलेला माणूस अनाथाश्रमात जन्मलेला, रिमांड होममध्ये वाढलेला, ज्याला स्वतःचे नांवही नसते अर्थात तो नेम नॉट नोन असतो. त्याला एक नंबर असतो. कैद्याला असतो तसा. त्याचे सर्व बालपणच प्रश्नांकित असते. एकूणच कौमार्य कुस्करलेलं..... तारुण्य अव्हेरलं गेलेलं..... तो जेव्हा वयात येतो तेव्हा त्याचेप्रश्नही वयात येतात आणि एक दिवस असे प्रश्नच त्याला मोठे करीत असतात अशा सारख्या अनेक प्रश्नातून तो शिकतो...सवरतो...आणि स्वतःला सावरतोही!

'आज खाली मी वर आकाश' घेवून जन्मलेला नायक हा आपल्या वयाची पंचावन्न वर्षे पूर्ण झाल्यावर आपण कोण? असा प्रश्न स्वतःशी विचारतो त्यावेळेला त्याच्यापुढे अनेक पर्यायांचा ढीग जमा झालेला असतो अर्थात नेम नॉट नोन ते वेलनोन असा प्रवास डॉ.सुनिलकुमार लवटे, प्राचार्य,महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे कार्यरत असलेले–'खाली जमिन वर आकाश' चे लेखक.....ते लिहितात मी चालत राहिलो.....प्रदेश मागे टाकत राहिलो.....आज माझ्या लक्षात येतं....क्षणिक बहकाव्यानं डाव साधलेली मंडळी परागंदा झालीत.....माझ्या घामानं कधीकाळी भिजलेला तो प्रदेश.....आज तिथं माझ्या स्वप्नांची फुलं उमललीत.....मीच पसरलेल्या त्या बीया....त्या शुध्द बीजापोटी आज गोमटी रसाळफळं मी पाहतो तेंव्हा लक्षात येतं साऱ्याच बीया धोतऱ्याच्या असत नाहीत, पारिजातकही असतो...दुस–यांचचं आंगण सुगंधित करण्याची उदारता रुजवायची तर तुमचचं मन उमदं असावं लागतं...थांबायची तयारी असेल तर उद्याचा दिवस तुमचा नि तुमचाच असतो हे अनुभवांनी मला दिलेलं शहाणपण होय. आता तेच मला तारत राहतं, तरुण बनवत राहतं! (पृष्ठ१००)

अशा कितीतरी सुख–दुखःच्या, ऊन–पावसाच्या खेळी चालू असतानाच्या या प्रवासात माझा सुर्य रोज नवी झळाळी घेऊन जन्माला येतो, तो समाज, शासन सर्वांच्या भरभरुन मिळणाऱ्या शाबासकीनं लेखक अचंबित होतो. तर कधी तो त्यातून मिळणाऱ्या उर्जेतूनच नवी उमेद घेवून पुन्हा कामाला लागतो. या सर्वांबद्दल महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमीनं एक्कावन्न हजार रुपये व प्रशस्तिपत्र देऊन केलेला शासकीय गौरव तोही 'सहयाद्री' अतिथिगृहात मा.मुख्यमंत्र्याच्या हस्ते झालेला असतो.

एका बाजूला कर्मभूमीने कर्मकहाणीस कोल्हापूर भूषण पुरस्काराने सन्मानित केले कधीकाळी नेम नोट नोन असलेला माणूस केव्हा वेलनोन होतो हे कळतही नाही. यावर स्वतः लेखक लिहितो 'यामध्ये माझ्या पुरुषार्थापेक्षा शासन व समाजाची उदारता मला मोठी वाटते'.(पृष्ठ क्र.203), आपण पाठीमागे टाकलेले सर्व आयुष्य अविश्वसनीय वाटावा. इतका सारा बदल एका जन्मात व्हावा हे आज खरे वाटत नसले तरी ते लेखकाचे जीवनवास्तव होते. यावर उलट मी माझ्या आयुष्याची लक्तरं होणार नाहीत याची काळजी सतत घेत राहिलो आणि विधायक कृती जोपासत असतो ही बिन टक्क्याची समाजक्रिया मला आजवरच्या टक्क्या टोणप्यानी शिकविली आहे. त्यामुळेच की काय हे माझे सारे आयुष्य सामाजिक कलाकुसरीचे झाले आहे असे लेखक मानतो.

लेखक लिहितो–मी रोज नवी वीण घालत शिकत गेलो त्यामुळे मला रोज नवे–नवे छोटे–छोटे ताजमहल दिसतात...खुणावतात....नव्या रचनेसाठी नव निर्मितीसाठी!! मला काय करायचं असा प्रश्न कधी पडत नाही, तर प्रश्नापेक्षा माझ्यापुढे पर्यायांचा सडा असतो ते मला घ्या मला घ्या म्हणून आर्जवत उभे असतात मी कालसापेक्ष पर्याय निवडतो...निवडीमध्ये विचार असतो...ध्येयही असते! केवळ संधीवर स्वार होण्याचा आततायीपणा मी कधीच केलेला नाही...उलट आपणांस जे पटत नाही ते निकराने नाकारण्याचा प्रयत्न केला. किंबहुना ते नाकारलेही, त्याचा कधीच प्रश्चाताप केला नाही. आज माझ्या समोर अनेक प्रश्न याचक बनून समोर येतात तेंव्हा मी उतून मातून त्याच्याकडे न पाहता आर्जव, ऋजुता एकवटून त्या सर्वांचे मी सन्मानपूर्वक स्वागत करतो. तेव्हा कुठेतरी आज सर्व प्रश्नांची उत्तरे मला मिळतात. सडा असा पडलेला असतो की वेचताना दमछाक होते आहे, माझ्या कालच्या आणि आजच्या जगात कमालीचा फरक जाणवतो की, हा गतकाळ माझाच होता! असे अचंबित करुन टाकणारे जीवन प्रत्येक वंचित घटकांच्या वाटयाला यावे असे प्रामाणिकपणे लेखकाला वाटते.

आपल्या आत्मकथनामध्ये लेखक म्हणतो पुर्वी माणूस पंढरपूरला गेला की, दोन ठिकाणी आपलं डोकं टेकवायचा एक पांडुरंगापुढे आणि दुसरं वा.बा.नवरंगे बालकाश्रमात! विठठल मंदीरात त्याला दगडातला देव भेटायचा आणि नवरंगे बालकाश्रमात त्याला माणसातले दगड दिसायचे....हो माणसातले दगड, छातीवर दगड ठेवून जो कोणी आपली मुले आश्रमाच्या दारात सोडतो, ते दगड नव्हे तर काय होते? असा हा वा.बा.नवरंगे बालकाश्रम लेखकाला शेकडा मुलामुलींची जन्मभूमी, आधारवड वाटचा....नंतर मात्र लेखक जस जसा मोठा होत गेला प्राध्यापक झाला त्यावेळी मात्र त्यांना हिंदी भाषा साहित्याच्या प्रचार व प्रसाराच्या या पर्वाने त्याचे अनुभव समृध्द बनवले. लेखकाने लेखन, वाचन यातून आपला आत्मशोध घेण्यास सुरुवात केली. आपल्या इतर सहकार्याचे नाकर्तेपण त्यांनी शब्दबध्द केले आहे.(पृष्ठ ९९)

नाकर्तेच ते
नामुष्की आपली लपवायची म्हणून
दरवाजा लोटायचा वेंधळेपणा
नेहमीच वेंधळेपणा करत आलेत ते
पण....
जगाला दार लागत नसतं
नि कुलूपही
हे त्यांना कसे उमजणार?
बशाबैल होऊन रवंथ करणे सोपे असते
चोथा चगळून रस तर सोडाच
थेंबभर लाळही पाझरत नसते
कावळयांच्या शाळेत
एखाद्याला वाळीत टाकणे सोपे असते
डोकी मोजणाऱ्या लोकशाहीत
बिनडोकांची सरशी नेहमीच असते.
कावळा म्हणून बहिष्कृत करुन
कोंबडयाचे आरवणे थांबत नसते
सुर्यास दडपणे सोपे का असते?

थोडक्यात डॉ.सुनिलकुमार लवटे हे नेम नॉट नोन असले तरी ते अनेक भल्याभल्याच्या दृष्टीने वेलनोन आहेत यात शंका नाही.

पारसे बिरा दशरथ
सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग, श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर.